महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004
दूरध्वनी – 020 25660593
ई-मेल – dycfpune@gmail.com

क्रमांक-ब/कक्ष-4-2/जमीन/ 1387 /2023-24, दिनांक - 15 / 12 / 2023.

पत्र

प्रति,
मा.मुख्य वनसंरक्षक(प्रा.),
पुणे वनवृत्त,पुणे.

विषय:-वन (संवर्धन)अधिनियम,1980 अंतर्गत पुणे महानगरपालिका,पुणे यांना पाषाण ते एनडीए या अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रूंदी करणासाठी मौजे बावधन, ता.मुळशी, जि.पुणे येथील 0.45 हे. राखीव वन जमीन वळतीकरणाबाबत.

संदर्भ-1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रं.एफएलडी-1923/प्र.क्र.278/फ-10, दि.22.09.2023.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-17/FCA-S1/PID-152747/ पुणे/1886, दि.25.09.2023.
3) आपले कार्यालयाकडील पत्र क्रं.4/4-कक्ष क्र.((2/जमीन/FCA411/B1428/2023-24, दि.03.10.2023.
4) मुख्य अभियंता(पथ)पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रं.पथ/8448, दि.06.11.2023.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्रं.1 अन्वये 1 ते 3 मुद्दयांबाबत खुलासा शासनास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. संदर्भिय पत्र क्रं.4 अन्वये प्रकल्प यंत्रणा यांचेकडून त्यांचे संबंधीत मुद्दा क्रं.2 व 3 बाबतचा खुलासा या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार संदर्भिय पत्र क्रं.1 अन्वये उपस्थित मुद्दयांचा खुलासा खालीप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| 1 | सदर प्रकरणी पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे भरे ता.मुळशी जि.पुणे येथील गट नं.406, मधील 0.50 हे. अवनत वनजमीनिचा गा.नं.नं.7/12 सादर करण्यात यावा. | सदर प्रकरणी पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या मौजे भरे ता.मुळशी जि.पुणे येथील गट नं.406, मधील 0.50 हे. अवनत वनजमीनिचा गा.नं.नं.7/12 यासोबत सादर करण्यात येत आहे. |
| 2 | सदर प्रकल्पास पुणे महानगरपालिकेची प्रशासकीय व तांत्रीक मान्यता प्राप्त झाल्याचे आदेश सदर प्रस्तावामध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे सदरचे आदेश सादर करण्यात यावेत. | "प्रकल्प यंत्रणा यांनी सदर्भिय पत्र क्रं.4 अन्वये पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे." सदर प्रकल्पास मा.महापालिका आयुक्त यांची ठ.क्र.6/621 दि.20.10.2022 रोजी प्रशासकिय मान्यता व मा.तांत्रीक छाननी समितीची ठ.क्र.122 दि.04.08.2022 रोजी तांत्रीक मान्यता प्राप्त झालेली असून सदर चे आदेश सोबत जोडून पाठवीत आहोत. |
| 3 | प्रस्तावासोबतच्या KML File अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रामध्ये बांधकाम असल्याचे दिसते. परंतु, सदरचे बांधकाम वन विभागाचे / पुणे महानगर पालिकेचे / अनाधिकृत बांधकाम / अतिक्रमण आहे. याबाबत स्पष्टता होत नाही. यामध्ये काही रस्त्याचे व इमारतीचे बांधकाम यापूर्वीच झाल्याचे दिसून येते. | "प्रकल्प यंत्रणा यांनी सदर्भिय पत्र क्रं.4 अन्वये पुढीलप्रमाणे खुलासा सादर केली आहे." पुणे महानगरपालिकेमध्ये बावधन खुर्द सन 1997 च्या मे.राज्य शासनाच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. सदर गावामधून जाणारा अस्तित्वातील NDA रस्ता बावधन खुर्द गाव पुणे महानगरपालिका मध्ये येण्या पूर्वी पासून आहे. प्रस्तावित भूसंपादित जागेवरील सीमाभिंतीचे काम वन विभागामार्फत करण्यात आलेले असून मान्य विकास |

| | | |
|---|---|---|
| | | आराखड्यामधील 36 मी रुंद डी.पी.रस्त्याने बाधित जागेवर प्रमाणरेषेनुसार बाधीत सीमा भितीचे बांधकाम पथ विभाग, पुणे महानगरपालिका मार्फत करण्यात येईल असे हमीपत्र देखील प्रकरणी समाविष्ठ करण्यात आलेले आहे. ते सोबत जोडून सादर करीत आहोत. |

प्रकरणी संदर्भिय पत्र क्रं.1 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या 1 ते 3 मुद्यांचा खुलासा पुढील उचित कार्यवाहिसाठी सविनय सादर.

सोबत – वरीलप्रमाणे 2 प्रती.

(महादेव मोहिते)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रत- मुख्य अभियंता(पथ)पुणे महानगरपालिका यांना वरीलप्रमाणे माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत - सहाय्यक वनसंरक्षक,(सांख्यिकी)पुणे यांना वरीलप्रमाणे माहिती व उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.

प्रत - वनपरिक्षेत्र अधिकारी,पौड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.